**वन्यप्राण्यांपासून होणा-या मनुष्यहानि, पिकांचे, फळझाडांचे झालेले नुकसान आणि पाळीव प्राण्याच्या झालेल्या हानीसाठी नुकसान भरपाई / अर्थसहाय्य देण्याचे अधिकार सहाय्यक वनसंरक्षक यांना प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी ०४१३/प्र.क्र.१२३/फ-१,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २५ नोव्हेंबर, २०१३.

**वाचावे :-**
१) शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-१०.०८/प्र.क्र.२७०/फ-१, दिनांक ०२.०७.२०१०.
२) शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३३७/फ-१, दिनांक ३०.०३.२०१३.
३) शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३३७/फ-१, दिनांक २९.०५.२०१३.
४) शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३२६/फ-१, दिनांक ०५.०९.२०१३.

**प्रस्तावना :-**

वाघ, बिबट्या, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, हत्ती, मगर व रानकुत्रे (ढोले) यांच्या हल्ल्यामुळे व्यक्ती मृत झाल्यास, कायम अपंग झाल्यास किंवा गंभीररित्या जखमी झाल्यास दिनांक ०२.०७.२०१०, ३०.०३.२०१३ व २९.०५.२०१३ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार अर्थसहाय्याची रक्कम संबंधितांना अदा करण्यात येते. तसेच राज्यातील रानडुक्कर, हरिण (सारंग व कुरंग), रानगवा, रोही (निलगाय), माकड, वानर तसेच वन्यहत्ती या वन्यप्राण्यांपासून शेतपिकाला किंवा फळबागांना नुकसान झाल्यास शासन निर्णय दिनांक ०२.०७.२०१० व दिनांक ०५.०९.२०१३ मधील तरतुदीनुसार नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांना अदा करण्यात येते.

दिनांक ०२.०७.२०१० च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार नुकसान भरपाईची / अर्थसहाय्याची रक्कम मंजूर करणारा अधिकारी उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा. तथापि विभागीय अधिकारी किंवा उप वनसंरक्षक दर्जाच्या अधिकारी जिल्हास्तरावर असल्याने अशी प्रकरणे निकाली काढून रक्कम अदा करण्यास काही कालावधी लागते. वन्यप्राण्यांपासून होणा-या मनुष्य हानी व पिकांचे नुकसानीबाबत अर्थसहाय्य/ नुकसान भरपाईची रक्कम तत्परतेने अदा करता यावी या दृष्टीने दिनांक ०२.०७.२०१० अन्वये वन्यप्राण्यांमुळे झालेल्या नुकसान भरपाई / अर्थसहाय्य अदा करण्याचे सद्य:स्थितीत विभागीय वनअधिकारी/उपवनसंरक्षक अधिकारी यांना असलेले अधिकार सहाय्यक वनसंरक्षक यांनाही प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

दिनांक ०२.०७.२०१० च्या शासन निर्णयामधील उल्लेखित अर्थसहाय्य / नुकसान भरपाई मंजूर करण्याचे अधिकार उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी यांचे बरोबर आता संबंधित परिक्षेत्राचे प्रभारी सहाय्यक वनसंरक्षक यांनाही प्रदान करण्यात येत आहेत.

1171
28/11/2013

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनैपचारिक संदर्भ क्रमांक १२३/व्यय-१० दिनांक. १५/६/२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.यु.एम.फारुकी)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रत माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी :-

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे प्रधान सचिव.
मा. उपमुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे सचिव.
मा. मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई.
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा.नागपूर,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक , सामाजिक वनीकरण, म.रा. पुणे
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर /मुंबई /नाशिक
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व
मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), सर्व
सर्व पोलिस आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व पोलिस अधीक्षक
उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
उपवनसंरक्षक (वन्यजीव), सर्व
विभागीय वन अधिकारी, सर्व
सहाय्यक वनसंरक्षक , सर्व
सर्व जिल्हा कृषी अधिकारी
महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
वित्त विभाग (व्यय-१० कार्यासन), मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
वन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ (निवडनस्ती).